Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 8 | April – 2017

"बीड जिल्हयाचा सांस्कृतिक इतिहास"

प्रा. गणपत विष्णु गट्टी
इतिहास विभाग , श्री पंडितगुरू पार्डिकर महाविद्यालय, सिरसाळा.

प्रस्तावना :

मराठवाडयाच्या ऐतिहासिक तथा सांस्कृतिक जडणघडणीचा विचार केल्यास बीड जिल्हयाचे योगदान आतिशय महत्वाचे ठरते.नांदेड जिल्हयाचा केल्यास बीड जिल्हयाचे योगदान अतिशय महत्वाचे ठरते.नांदेड जिल्हयाचा उपवाद वगळता सर्व जिल्हयांचा बीड जिल्हयाशी असलेला संबंध अधोरेखित करण्यासारखा आहे.म्हणजे मराठवाडयातील सर्व ऐतिहासिक व सांस्कृतिक महामार्ग बीडमधुनच कधीकाळी जात असल्याने या सांस्कृतिक पथावरील एक महत्वाचा थांबा म्हणुन बीड जिल्हयाचे महत्व असल्याचे जाणवते.ऐतिहासिक काळात सातवाहनापासुन ते यादवापर्यंत आणि नंतरच्या इस्लमिक राजवटीत बीडचे सांस्कृतिक महत्व अबाधीत राहिल्याचे दिसते. गोदावरी ही मराठवाडयाची विभाजक रेखा असल्याने दक्षिणेकडील विशेषत: कर्नाटकातील राजवटीचे बीडवर प्रभुत्व असल्याचे जाणवते. त्यातही चालुक्यांच्या राजवटीत आणि राष्ट्रकुट यादवांच्या दक्षिणेकडुन उत्तरेकडच्या प्रवासात बीड जिल्हा विशेष प्रकाशात आल्याचे दस्तरखुद्द बीड, परळी, धर्मापुरी, पानगाव, अंबाजोगाई येथील मंदिर अवशेषावरून व त्यांच्या स्थापत्यावरून दिसुन येते. इतिहासामध्ये वारंवार लिखाण झाले पाहिजेतसेचस्थानिक इतिहासाचे खोलात जाउन संशोधन करून उपेक्षित इतिहासाला मुळ प्रवाहात आणले पाहिजेही आता काळाची गरज आहे.त्यामुळे राष्ट्राचा इतिहास समृध्द होण्यास हातभार लागणार आहे.

प्राचीन काळापासुन आजतागायत मानवाने जीवनाच्या विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा म्हणजे इतिहासहोय. बीड शहर व परिसराचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाच्या अभ्यासासाठी मांजरसुंबा घाटाच्या पायथ्याशी असणाऱ्या पालीगावातील नगनाथ मंदिरावर असणारा यादव सम्राट सिंघनदेव यादवांचा शिलालेख महत्वाचा ठरतो. बिंदुसराय नदीच्या काठावर असणारेहे नागनाथ मंदिरहेमाडपंथी शैलीचे एक महत्वाचे मंदिर मानले जाते.आजही या मंदिरावरील शिलालेखाहुन या मंदिराचे यादवकालीन वैभव स्पष्टहोते. बीड शहराच्या मध्यभागातुन वाहणाऱ्या बिंदुसराय नदीच्या पुर्वकाठावरती देखणे कंकालेश्वर मंदिर म्हणजे चालुक्यांच्या सौंदर्यदृष्टीचा सर्वांगसुंदर मनुनाचहोय. स्थापत्य आणि शिल्पकलेच्या दृष्टीने विलक्षण वैशिष्ट्यपुर्ण असणारेहे शिवालय मुळातहे दशावतारी मंदिर असुन या मंदिराचे अनेक वैशिष्ट्य अद्यापही अंधारात आहेत. महाराष्ट्रातील अर्वांग सुंदर जलमंदिर म्हणुनही अभ्यास या मंदिराकडे पाळतात. चालुक्य काळात बीड व नगरच्या सुभ्याला त्या काळात फार मोठे महत्व असावे कारण चालुक्यांनी धर्मापुरीला आपल्या धार्मिक राजधानीचाच दर्जा दिल्याचेसंकेत मिळतातत्तर बीड येथे सहाव्या विक्रमादित्याने कंकालेश्वर सारखे अनुपम अशा स्वरूपाचे शिवालय उभारून या नगराचे अनन्यसाधारण असे महत्व वाढवले आहे. मंदिरावरील शिल्प चांगलाच प्रकाश टाकतात.दुर्दैवाने आज मंदिरावरील एकही शिल्प पुर्ण अवस्थेत नाही.तरीही मंदिराचेसौंदर्य प्रस्फुटीत झाल्याशिवाय राहत नाही. या शिल्पसमुहाचेठळक वैशिष्ट्य म्हणजे प्रत्यक्ष घणघोर लढाईत विविध आयुध घेऊन लढणाऱ्या आक्रमणावस्थेतील स्त्रियांची शिल्पेहोय. याशिवाय आदिनाथ व अरयनाथ या जैन तिर्थंकरांची शिल्पेतत्कालीन समाजव्यवस्थेतील धार्मिकसहिष्णुतेचाचसंदेश देतात. मंदिराच्या बाहेरील भागात अलीकडच्या काळात काही नव्याने छोटी मंदिरे बांधली असुन त्यामध्ये प्रामुख्याने दुर्गामाता, गंगादेवी, कालभैरव, विठ्ठल रूख्माई, शनी आदि. देवतांच्या मुर्त्यास्थापीत करण्यात आल्या आहेत. कंकालेश्वर मंदिरावरील सुरेख नक्षीकाम, आकर्ष स्तंभ, गोल गर्भगृहाचे चित्तवेधक कोरीव काम व मंदिरावरील मुर्त्यांची शैलीही चालुक्यांच्या स्थापत्य कलेशीतंतोतंत जुळणारी आहे.याशिवाय हे मंदिर कल्याणीच्या चालुक्यांनीच उभारल्याचा ठोस पुरावा म्हणजे चालुक्याची राजधानी कल्याणी (बसव कल्याण) येथे चालुक्यांनी उभारलेल्या अनुभव मंडपाचे स्तंभ होय.

बीड जिल्हा अनेक वैशिष्ट्यांनीसमृध्द आहे.मध्ययुगात अनेक थोर संत, विचारवंत या भुमीत होऊन गेले.त्यामध्ये एक वीरशैव धर्माला तात्विक बैठक देण्याचे मुलभुत काम करणारे संत शिरोमणी मन्मथस्वामी यांचे नाव महत्वाचे आहे. एकीकडे चाललेलीसत्ताधीशशाही दुसरीकडे चालु असणारे धार्मिक रणकंदन, गावागावांच्या सिमाहुन येणारे कांठाळया बसवणारे तोफांचे आणि तलवारीचे आवाज अशा अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत या क्रांतीकारी विचारवंताचा शके१४८२मध्ये बीडच्या सिमेवरील कळंब परिसरात जन्म झाला. तोच विचारवंत पुढे महान संतकवी म्हणुन लक्षावधी लोकांच्या श्रध्देचे स्थान झाला. मन्मथस्वामी मध्ययुगातील धार्मिक क्रांती करणाऱ्या इभुती मधील एक अग्रगण्य नाव

होय. परिवर्तनवादी कवी, जनतेला जनबोली मध्ये धर्म सांगुन धार्मिक अवडंबराच्या विरोधात जनमत निर्माण करणारा तत्ववेता होय. मन्मथस्वामींच्या या विलक्षण व्यक्तीमत्वामुळे श्रध्दाळु भक्तांनी त्यांना विश्वरत्व प्रदान केले. मन्मथस्वामींच्या साहित्यावर चिंतन आणि सखोलसंशोधन झालेतर पंधराव्या शतकात जन्मलेल्या या महान तत्वतेत्याची देशाल ओळखहोऊनतत्कालीनसंत साहित्यावर मोठाच प्रकाश पडु लागला. बीडची ग्रामदेवता खंडेश्वरीच्या मंदिराच्या उभारणीचा निश्चित काळ अंधारात असला तरी पुरातत्व विभागाच्या नोंदीनुसार१६ते १७ व्या शतकाच्या दरम्यान हे मंदिर उभारले गेले असावे.धनगरसमाजातील भक्त कानोजी नायर यांनीहे मंदिर बांधले अशी लोकांची श्रध्दा आहे.या मंदिराच्या चारही बाजुने संरक्षण भिंत व नगारखाना वजा प्रवेशव्दार होते.मंदिरामध्ये गेल्यानंतर लहान दिपमाळ व होमकुंड आहे.पादुकांच्या उजव्या बाजुला भक्तांसाठी बसण्यास हेमाडपंथी शैलीची एक दरवाजा व भिंत नसलेली दगडी ओवरी आहे.त्यावर एक शिलालेखहोता.या शिलालेखावरून अहिल्याबाई होळकरांनी मंदिराचा जिर्णोध्दार केल्याचा निष्कर्ष शिलालेखामधुन मिळतो.

बीड जिल्हयाच्या परिसरावर प्राचीन काळी चालुक्यांनी राज्य केले यांचा सर्वांगसुंदर पुरावा म्हणजे धर्मापुरीचे केदारेश्वर शिव मंदिरहोय. अजिंठा, वेरूळ वगळता इतिहासाच्या प्राचीन व मध्ययुगीन कालखंडातील मराठवाडयात जी मोजकी कलात्मक मंदिरे आज आहेत त्यात धर्मापुरीचे शिवालय मंदिर वरच्या क्रमांकाचे आहे. केदारेश्वर मंदिरावरील शिल्प चालुक्य कालीन संपन्न समाज जीवनाची साक्ष देतात. शिल्पामधील प्रमाणबध्दता, तालबध्दता, रचना, सुक्ष्मभाव, शरीराची ठेवण हे एवढे अप्रतिम आहेत की, शिल्पांच्या विषयात भिन्नता असतानाहीसंपुर्ण शिल्पसमुहामध्ये एकसमान लयबध्दता जाणवते आणि आपण मध्ययुगाच्या कलेच्या अतिउच्च कालखंडाचे जणु एक कवीताच अनुभवत असतो. मंदिराचा बाहयभाग पाषाण शिल्पकुंजांनी विलक्षण शोभनीय केला आहे. लक्ष्मी,विष्णु, शंकर, पार्वती, गणेश, नरसिंह या देवदेवतांच्या शिल्पांसह शृंगारीक व नृत्यरत रूपगर्वितांची शिल्पेही अजोड आहेत. त्यांची प्रमदा, चंचला, प्रथुला, मदालासा, गजगामिनी अशा विविध रूपातील चित्तवेधक शिल्पे बघणाऱ्यांना घायाळ केल्याशिवाय राहत नाही.चालुक्य राजे मुळातच कलाप्रेमीहोते.हळेबीड, बादामी परिसरातील मंदिरे व लेण्यावरील शिल्पे पाहिल्यानंतरहा भाव आधिक गडदहोतो.कल्याणी वंशातील चालुक्य राजा विक्रमादित्य सहावा यांनी मंदिर उभारले.मंदिर शिल्पकलेच्या दृष्टीनेतर अवर्णनीय आहेच पण इतिहास अभ्यासकांच्या दृष्टीने मध्ययुगीन इतिहासाचे नवनवीन पान उघडणारेठरते.या शिल्पावरून तत्कालीन समाज व्यवस्थेचे स्वरूप, अलंकार, वेशभुषा, केशभुषा, राहणीमान, धार्मिक, सामाजिक चालीरिती, परंपराचेही दर्शनहोते.या शिल्पसमुहाचे वैशिष्ट्य म्हणजे ब्रम्हा, विष्णु, महेश यांच्यासह पुराणातील कथांना उद्गत करणारी अशी अनेक शिल्पे येथे आहेत.तसेच सामाजिकसंदेश देणारी आणि सर्वसामान्य माणसाला प्रतिबिंबीत करणारी शिल्पेही येथे आढळतात.शिल्पसमुहाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे शिल्पकारांनी देवादिकांच्याच बाजुला सर्वसामान्य माणसाला स्थान दिले असुन अशी शिल्पे मंदिरावर मोठ्या प्रमाणावर आढळतात.

बीड जिल्हयामध्येसांस्कृतिक एकते बरोबरच राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रकारच्या सूफीसंतांनीही महत्वपुर्ण योगदान दिले आहे.बीड शहरातील मन्सुर शहावलीचा दर्गा एक राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे.शुर मराठा सरदार महादजी शिंदे हे नैराश्याने ग्रासलेले असताना त्यांना खाजा मन्सुरशहा यांना आपले गुरूच मनले त्यांनी त्यांच्या निवासस्थानाची व्यवस्था केली.बीडच्या मोंढा भागात मन्सुरशाह यांचा दर्गा आहे. या दर्ग्यात मन्सुरशाह बाबा यांची मधोमध मजार असुन त्यावर संगमरवरी दगडाची सुबक कोरीव काम केलेली छत्री आहे. तत्कालीन काळामध्येसिंधी या परिवाराने या दर्ग्याच्या देखरेखीसाठी जमीनीही दान दिली आहे.मन्सुरशाह वलीबाबा हे इस्लाम धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी भारतात आलेहोते. आरंभीच्या काळात गाजीपुरा वस्तीतील हजरत गोशा नसीम यांच्या मजारीजवळ राहिले. त्यांचे बडील बोधलशहा यांच्याकडुन धर्मज्ञान प्राप्त केलेतरहजरतसमद सहरवर्दी यांच्याकडुनत्यांनी दिक्षा घेतली.आपली सर्वच प्रगती मन्सुरशाह वलीबाबा यांच्यामुळेच झाली असे अद्यापहीसिंधी या परिवाराची श्रध्दा आहे.

संदर्भ ग्रंथसुची :-

१) दक्षिणेच्या मध्ययुगीन इतिहासाचीसाधने खंड २ - प्रा.ग.ह.खरे
२) प्राचीन शिव व जैन मंदिरे - डॉ.अनिल कठारे, डॉ. गजानन पाटील, डॉ.अशोक साबणे
३) महाराष्ट्रातील बारव स्थापत्य - डॉ.अरूणचंद्र पाठक
४) मराठवाड्याचे कलावैभव - डॉ.म.श्री.माटे
५) मराठवाड्याचा इतिहास- डॉ.सोमनाथ रोडे
६) भारतीय कलेचा इतिहास - डॉ.अनिल कठारे
७) मराठवाड्याची पुर्वरंग - डॉ.रा.श्री.मोरवंचीकर